


# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली

एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी (27 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस सत्तावीस:

CLICK HERE



टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.

## ५. मला शिकायचंय !

"अहो सखाराम, तुम्हांला माहीत आहे का, आपल्या जिल्ह्याची जिल्हाधिकारी कोण आहे ? एक महिलाच आहे. तालुक्याच्या पोलीस स्टेशनलाही इन्स्पेक्टर म्हणून महिलाच आहे. शेजारच्या गल्लीतल्या त्या दामूअण्णांची लेक डॉक्टर झाली गेल्या वर्षी. माहितीय ना तुम्हांला ! अजून किती उदाहरणं द्यायची ! आता कित्येक डॉक्टर, वकील, इंजिनियर या महिला आहेत. त्या साऱ्यांच्या पालकांनी तुमच्यासारखाच विचार केला असता तर ?"

सराव

सखारामला काय बोलावं ते सुचेना. आता त्याला पटलं होतं – 'आपुरं शिक्शन नको.. दिनरात कष्ट करसू, रगतनं पानी करसू, पन मन्हा आंडेरले शिकाडसू...' तसं त्यानं बोलून दाखवलं.

स्नेहानं वडिलांकडे पाहिलं व ती त्यांना आनंदानं बिलगली. सरपंच व मुख्याध्यापक त्या दोघांकडे पाहतच राहिले. स्नेहाचा चेहरा आनंदानं फुलला होता.

**– आबा गोविंदा महाजन**

शब्दार्थ : **पाचवीमा** – पाचवीला. **मन्हंबी** – माझंपण. **माले** – मला. **चवथीलोंग** – चौथीपर्यंत. **शिकाडं** – शिकवलं. **आते** – आता. **शिकीसन** – शिकून. **गरीबीनी** – गरिबीची. **परगावले** – परगावला. **धाडू** – पाठवू. **तुले** – तुला. **एसटीमा** – एस. टी. ने. **पडीन** – पडेल. **तनंपेक्षा** – त्यापेक्षा. **शाय** – शाळा. **बशीसन** – बसून. **धाकला** – धाकटा. **भाऊले** – भावाला. **संभाय** – सांभाळ. **अचंबा** – आश्चर्य. **तुन्ही** – तुझी. **मन्ही** – माझी. **तिनाच** – तिच्याच. **तिलेबी** – तिलापण. **शे ना** – आहे ना. **आठून** – इथून. **मन्हा** – माझ्या. **बाबतमाच** – बाबतीतच. **रगतनं** – रक्ताचं. **करसू** – करेन. **आंडेरले** – मुलीला. **शिकाडसू** – शिकवेन.

### स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) स्नेहा का रडत होती ?
(आ) सरपंचांनी बबलीला कोणत्या इयत्तेत प्रवेश घेतला होता ?
(इ) मुख्याध्यापक आणि सरपंच सखारामच्या घरी का गेले ?
(ई) स्नेहाला अतिशय आनंद का झाला ?

**प्र. २. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) स्नेहाची आई चिंतेत का पडली ?
(आ) मुख्याध्यापक सखारामला पोटतिडकीने काय सांगू लागले ?
(इ) सरपंच समजुतीच्या स्वरात सखारामला काय म्हणाले ?
(ई) सखारामने शेवटी कोणता निर्णय घेतला ?

**प्र. ३. खालील शब्दसमूहांचा/वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

(अ) चिंतेत पडणे.
(आ) गहिवरून येणे.
(इ) डोळे पाणावणे.
(ई) अचंबा वाटणे.
(उ) पोटतिडकीने बोलणे.
(ऊ) रक्ताचे पाणी करणे.

# लगतची मागची व पुढची संख्या लिहा.

**२. संख्याज्ञान**

टेस्ट मोडवा

**उजळणी**

## लगतची मागची व लगतची पुढची संख्या सांगणे

मेरी : नंदू १२० च्या लगतची पुढची संख्या सांगतोस का?
नंदू : १२१
मेरी : १९९९ च्या लगतची पुढची संख्या सांगतोस का?
नंदू : मला नाही सांगता येत.
ताई : लगतची पुढची संख्या १ नं मोठी असते, तर लगतची मागची संख्या १ नं लहान असते.
नंदू : म्हणजे, १९९९ मध्ये १ मिळवल्यास लगतची पुढची संख्या १९९९ + १ = २००० ही मिळेल.
ताई : तसंच दिलेल्या संख्येतून १ वजा केल्यास लगतची मागची संख्या मिळते.
नंदू : म्हणजे १९९९ च्या लगतची मागची संख्या १९९८ आहे.

**स्वाध्याय**

लगतची मागची संख्या व लगतची पुढची संख्या लिहा.

| संख्या | लगतची मागची संख्या | लगतची पुढची संख्या | संख्या | लगतची मागची संख्या | लगतची पुढची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २९९९ | | | १००० | | |
| ३८०० | | | ३४५९ | | |
| ७७९८ | | | ५००९ | | |

## संख्यांचा लहान–मोठेपणा

ताई : संख्यांच्या लहान–मोठेपणाविषयी तुम्ही काय शिकला आहात ?
नंदू : कोणतीही तीन अंकी संख्या, कोणत्याही दोन अंकी संख्येपेक्षा मोठी असते.
प्रिया : दोन्ही संख्या तीन अंकी असतील, तर जिचा शतकस्थानचा अंक मोठा, ती संख्या मोठी.
ताई : मग आता चार अंकांपर्यंतच्या संख्यांचा लहान–मोठेपणा कसा ठरवाल ?
प्रिया : कोणतीही तीन अंकी संख्या, कोणत्याही चार अंकी संख्येपेक्षा लहानच असणार !
नंदू : दोन्ही संख्या चार अंकी असतील, तर जिचा हजारस्थानातील अंक मोठा, ती संख्या मोठी. हजारस्थानचे अंक सारखे असतील, तर शतकस्थानचे अंक पाहून ठरवू. तेही समान असतील, तर दशकस्थानावरून लहान–मोठेपणा ठरवू. जसं, ४५६७ > ४३२५.

**स्वाध्याय**

खालील सारणी पूर्ण करा.

| संख्या | लहान संख्या | मोठी संख्या | संख्या | लहान संख्या | मोठी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २१२३, १९६८ | | | ९९९९, ९९९ | | |
| २३४२, २४३२ | | | ६०७०, ८०७९ | | |
| ९५४२, ९५४९ | | | ५९७८, ७५३९ | | |

Write the numbers just before and after.

## 2. Number Work

टेस्ट सोडवा

Revision

### The numbers just before and after a given number

**Mary** : Nandu, can you tell the number just after 120?
**Nandu**: 121.
**Mary** : Now tell the number just after1999.
**Nandu**: I can't tell.
**Tai** : Remember, the number just after any number is greater by 1 and the number just before it is smaller by 1.
**Nandu**: Yes. So, if I add 1 to 1999 I will get the next number 1999 + 1 = 2000. Also, the number just before 1999 is 1998.

**Exercise**

Write the number just after and the number just before the given number.

| Number | The number just before | The number just after | Number | The number just before | The number just after |
|---|---|---|---|---|---|
| 2999 | | | 1000 | | |
| 3800 | | | 3459 | | |
| 7798 | | | 5009 | | |

### Comparing numbers

**Tai** : What do you remember about comparing numbers?
**Nandu**: Any three-digit number is bigger than any two-digit number.
**Priya** : And if both numbers have three digits, then the one with the bigger hundreds digit is the bigger number.
**Tai** : So now, how will we compare numbers having up to four digits ?
**Priya** : Any three-digit number will be smaller than any four-digit number !
**Nandu**: If both numbers have four digits, the number with the bigger thousands digit will be the bigger number. If the thousands digits are equal, we'll compare the hundreds digits. If those are also equal, look at the tens digits to determine the smaller and bigger number. For example, 4567 > 4325.

**Exercise**

Complete the following table.

| Numbers | Smaller | Bigger | Numbers | Smaller | Bigger |
|---|---|---|---|---|---|
| 2123, 1968 | | | 9999, 999 | | |
| 2342, 2432 | | | 6070, 8079 | | |
| 9542, 9549 | | | 5978, 7539 | | |

टेस्ट सोडवा

## Listen and understand.




**Uncle** : (*Counts*) 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8 and 9.
I see nine children in all.


**Ishan** : (*Sighs.*) That's all right then.
Come on, Isha-Nisha, Babali-Papali,
Gotu-Chhotu, Ricky-Vicky.
1 - 2 - 3 - 4 - 5 - 6 - 7 - 8!
What! This is too much!
The ninth child is missing again!
What a naughty child!
(*The other children start giggling.*)

Oh, no! What shall I do?
I am the oldest. Everyone will scold me.
And I don't even know who is missing.
(*Didi walks in.*)

**Didi** : Hello, everybody!
Coming back home? Let's go together.

**Ishan** : Didi, Didi, there's a problem. One of us is missing.
First we were nine. Now we are only eight.

**Didi** : Let me see. 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8 and 9!
But you are nine! No one is missing.



**Ishan** : So, that naughty child has come back again!
When I count, this naughty child runs away.
1, 2, 3, 4, 5, 6, 7 and 8! See!

**Didi** : Yes! I see.
And I also see one more child
who forgets to count himself!

**Ishan** : Oh, no! (*Laughs.*)
How silly of me! (*Everyone laughs.*)

पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

## ३. साठवण पाण्याची



**पाणपोई**

घराबाहेर पडलेल्या लोकांना तहान लागल्यावर पिण्यासाठी पाणी लागते. यासाठी काही ठिकाणी रांजण अथवा माठ पाण्याने भरून पाणी पिण्याची सोय केली जाते, ती पाणपोई होय. पाणपोईच्या पाण्यासाठी मोबदला घेतला जात नाही. काही व्यक्ती किंवा संस्था अशा पाणपोई सुरू करतात. त्यामुळे लोकांची पिण्याच्या पाण्याची सोय होते. विशेषतः उन्हाळ्यात पाणपोईचा खूप उपयोग होतो.

### माहीत आहे का तुम्हांला

**छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्ग (किल्ले) उभारताना पुढील सूचना केल्या –**

''गडावर आधी उदक (पाणी) पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि तें स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी बांधावी.'' ''गडावरी झराही आहे, जसें तसें पाणीही पुरतें, म्हणून तितकियावरची निश्चिंती न मानावी...,'' ''याकरिता तसे जागी जाखिरियाचे (साठवलेले) पाणी म्हणून दोन चार तळी बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊं न द्यावे, गडाचे पाणी बहुत जतन करावे...''

### आपण काय शिकलो

* पाणी साठवण्याच्या पारंपरिक पद्धती.
* पाणी साठवण्याच्या सध्याच्या पद्धती.
* पाण्याचा काटकसरीने वापर.

### हे नेहमी लक्षात ठेवा

पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिचा वापर सर्वच सजीव करतात. याचे भान ठेवून पाण्याचा वापर केला पाहिजे.

### स्वाध्याय

**(अ) थोडक्यात उत्तरे द्या.**

(१) पाणी कशासाठी साठवायचे ?

(२) पारंपरिक पद्धतीत घरात पाणी कसे साठवत असत ?

(३) धरण कशावर बांधतात ?

(४) पाण्याचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी ?

(५) पाण्याचे प्रदूषण म्हणजे काय ?

**(आ) पाणीटंचाई असलेल्या भागात पाणी कसे साठवता येईल, याचा विचार करा. त्यासाठी काय करता येईल ते सूचवा.**

**(इ) पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी कोणत्या चांगल्या सवयी आपण स्वतःला लावून घ्याव्यात ?**

***

## ४. शिवरायांचे बालपण

टेस्ट सोडवा

**वाचा व समजून घ्या.**



शिवनेरी किल्ल्यावरील शिवरायांचे जन्मस्थान

**शिवजन्म :** ते दिवस फार धामधुमीचे होते. उत्तरेकडून मुघल बादशाहा शाहजहान याने दख्खन सर करण्यासाठी मोठे सैन्य रवाना केले होते. शहाजीराजांच्या जहागिरीचे गाव पुणे. विजापूरच्या आदिलशाहाने ते बेचिराख करून टाकले होते. शहाजीराजे अडचणीत सापडले होते. इकडे आड तिकडे विहीर ! शहाजीराजांच्या वाट्याला धावपळीचे आयुष्य आले.

अशात जिजाबाई गरोदर होत्या, तेव्हा या धामधुमीत आणि धावपळीत त्यांना ठेवायचे कुठे, हा प्रश्न उभा राहिला. शहाजीराजांना शिवनेरी किल्ल्याची आठवण झाली. जिजाबाईंना त्यांनी शिवनेरीवर ठेवायचे ठरवले. शिवनेरी हा पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळील किल्ला. त्याच्या चारी बाजूंना उंच कडे, भक्कम तटबंदी आणि बळकट दरवाजे होते. किल्ला मोठा मजबूत होता. विजयराज हे त्याचे किल्लेदार होते. ते भोसल्यांच्या नात्यातलेच होते. जिजाबाईंच्या

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here